# ०५. दोन दिवस

**- नारायण सुर्वे**

**प्र.१ योग्य पर्याय निवडा.**

१. शेकडो वेळा चंद्र आला, . . . .

**अ. तारे फुलले, रात्र धुंद झाली** ब. कवीचे आयुष्य वाट पाहण्यात गेले
क. कवीची जिंदगी बरबाद झाली ड. प्रत्येक वेळी अश्रू रोखावे लागले

२. झोतभट्टीत पोलाद ज्याप्रमाणे शेकते, त्याचप्रमाणे . . . . .

अ. कवी स्वतः भाजून निघाला **ब. कवीचे आयुष्य शेकले गेले**
क. दुनियेने झोतभट्टीचे स्वरुप धारण केले ड. लोखंड वितळले गेले

३. हे हात माझे सर्वस्व . . . . .

अ. अति श्रीमंत झाले ब. अति गरिब झाले
**क. दारिद्रयाकडे गहाणच राहिले** ड. श्रीमंतीकडे गहाणच राहिले

**प्र.२ एका शब्दात उत्तरे लिहा.**

१. कवीचे सर्वस्व असलेली गोष्ट : **कवीचे हात**
२. कवीचा जवळचा मित्र : **अश्रू**
३. कवीला पेलावे लागलेले : **दुःख**
४. भाकरीचा चंद्र शोधण्यात बरबाद झालेली : **जिंदगी**
५. डोक्यावर उरलेले : **उन्हाळे**
६. चंद्राला दिलेली उपमा : **भाकरीची**
७. दोन दिवस ही कविता यामधून घेतली : **ऐसा गा मी ब्रह्म**

**प्र.३ एका वाक्यात उत्तरे लिहा.**

**१. कवी कोणता हिशोब करतो आहे?**

उत्तर आयुष्याची किती वर्षे उरली याचा हिशोब कवी करतो आहे.

**२. शेकडो वेळा चंद्र आला म्हणजे काय?**

उत्तर अनेक वेळा रात्र व दिवस आला आणि गेला म्हणजे शेकडो वेळा चंद्र आला.

**३. कवी कोणत्या गोष्टीला सर्वस्व मानत होते?**

उत्तर कवी आपल्या हातांना सर्वस्व मानत होते.

**४. मित्र बनून कोण सहाय्यास धावून आले?**

उत्तर मित्र बनून अश्रू सहाय्यास धावून आले.

**५. जगाच्या शाळेत कवी काय शिकले?**

उत्तर जगाच्या शाळेत कवी दुःख पेलायला शिकले.

**प्र.४ आकृतीबंध पूर्ण करा.**

१. नारायण सुर्वेंचे आयुष्य असेच गेले : **दु:खात , वाट पाहण्यात**

२. कवी जगाच्या शाळेत शिकले : **दु:ख पेलावे कसे , जगावे कसे**

३. झोतभट्टीत शेकून निघाले : **आयुष्य , पोलाद**

४. शेकडो वेळा आलेले : **चंद्र , तारे, रात्र**

५. कवींनी पाहिलेली आपल्या हातांची रुपे :

**दारिद्र्याकडे गहाण राहिलेले, माना उंचालेले,कलम झालेले**

**प्र.५ खालील ओळींचे रसग्रहण/आशय/भावार्थ/काव्यसौंदर्य /सरळ अर्थ स्पष्ट करा.**

**१. दोन दिवस वाट पाहण्यात गेले, दोन दु:खात गेले,**
**हिशोब करतो आहे किती राहिलेत डोईवर उन्हाळे**

उत्तर **संदर्भ:** ऐसा गा मी ब्रह्म या काव्यसंग्रहातून घेतलेल्या दोन दिवस या कवितेत कवी नारायण सुर्वे यांनी कामगारांच्या वास्तव जीवनाचे व त्यांच्या मनोव्यवस्थेचे चित्रण केले आहे.

**सरळ अर्थ:** प्रत्येक माणसाचे आयुष्य किती क्षणभंगूर आहे हे सांगतांना कवी म्हणतात की, कामगारांचे जीवन खरे तर चार दिवसांचेच आहे. त्यातील दोन दिवस सुख , आनंद, समृध्दी ची वाट पाहण्यात गेले, तर उलेले दोन दिवस पोटापाण्याची काळजी करण्यात गेले व दु:खात गेले. या खडतर आयुष्यात जगण्याची उमेदच संपून गेली. अशावेळी उरलेल्या आयुष्याचा जमाखर्च मांडतो आहे. आता किती उन्हाळे , किती ऋतू जगायचे उरलेत याचा हिशोब करतो आहे.

अशाप्रकारे कवींनी कामगारांच्या जीवनातील भयाण वास्तवाची जाणीव करून दिली आहे.

**प्र.६ स्वमत / थोडक्यात उत्तरे.**

**१. दोन दिवस या कवितेत व्यक्त झालेले जीवनसत्य किंवा कष्टकऱ्यांच्या जीवनाविषयी तुमचे विचार स्पष्ट करा.**

उत्तर कामगारांना अतिशय कष्टमय आयुष्य जगावे लागत आहे.त्यांचे अर्धे आयुष्य सुखाची वाट पाहण्यात तर, अर्धे दु:ख झेलण्यात गेले. सुख हे दुरून दिसणाऱ्या चंद्रासारखे आहे. या भाकरीच्या चंद्राला शोधण्यात जिंदगी बरबाद झाली. पोटाच्या भुकेसाठी, दोन घासांसाठी पूर्ण हयात गेली. अशावेळी फक्त अश्रूंची साथ लाभली. हातांनी खूप कष्ट केले, झोतभट्टीत शेकून निघाले पण शेवटी दारिद्र्याकडे गहाणच राहिले. तरीही धीर न सोडता जीवन कसे जगावे हे अनुभवाच्या शाळेत शिकलो. आयुष्यात बरेवाईट प्रसंग आले ते निभावून नेले. दोन दिवस सुखाची वाट पाहण्यात गेले, दोन दिवस दु:खात गेले.

अशा प्रकारे कवितेत कष्टकऱ्याच्या जीवनातील जीवनसत्य कवीने व्यक्त केले आहे.

*************************************************